
# जागृती १

## शेतकरी संस्था
## परिचय आणि गरज



# सहकाराची तत्त्वे


ऐच्छिक व सर्वांना खुली सदस्यता
शेतकरी संस्था
लोकशाही पद्धतीने सदस्य नियंत्रण
सर्वसाधारण सभा
सदस्यांचा आर्थिक सहभाग
स्वायत्तता आणि स्वातंत्र्य
शेतकरी संस्था
शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती
सहकारी संस्थामधील सहकार्य
सहकारी
समाजाची चिंता
आरोग्य शिबिर

१

# जागृती

## शेतकरी संस्था परिचय आणि गरज

शेतकरी संस्थेच्या संचालकांसाठी
अभ्यास पुस्तिका संच



DGRV apmas BAIF

# जागृती

## शेतकरी संस्था परिचय आणि गरज

**प्रथम आवृत्ती – मे २०२१**

**किंमत – रु.१००/–**

**पुनर्मुद्रणाचे हक्क राखीव आहेत.**

एपीएमएएसच्या परवानगीने आणि एपीएमएएस आणि डीजीआरव्ही लोगो वापरुन सामग्री पुन्हा मुद्रित केली जाऊ शकते.

पुस्तकांच्या मागणीसाठी आपण एपीएमएएस आणि बाएफच्या कार्यालयात फोनद्वारे किंवा मेल पाठवून संपर्क साधू शकता.

**द्वाराप्रकाशित**

**महिला अभिवृद्धी सोसायटी (एपीएमएएस)**

प्लॉट क्र. ११ आणि १२, हुडा कॉलनी, तानेशानगर, माणिकोंडा

हैदराबाद – ५०००८९, तेलंगणा, भारत

कार्यालय – ०८४१३–४०३११८ / ०८४१३–४०३१२०

ई–मेल – info@apmas.org वेबसाईट – www.apmas.org

आणि

**बाएफ विकास अनुसंधान प्रतिष्ठान**

डॉ मणिभाई देसाई नगर, वारजे,

पुणे ४११०५८, महाराष्ट्र, भारत

कार्यालय – ०२०–२५२३१६६१

ई–मेल – baif@baif.org.in वेबसाईट – www.baif.org.in

# शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी स्वयंशिक्षण पुस्तिका संच कशासाठी?

भारतीय शेतकरी अनेक आव्हानांना तोंड देत असले, तरी गेल्या दशकात कृषी क्षेत्राला महत्वपूर्ण गती मिळाली आहे. शेतकऱ्यांना संघटित करणारी शेतकरी संस्था (एफपीओ), ही धोरणकर्त्यांनी आणि अभ्यासकांनी, शेतकरी समृद्धीसाठी सगळ्यात जास्त प्राधान्य दिलेली संस्थात्मक रचना म्हणून उदयास आली आहे. 'शेतकरी संस्था' हे पुढील पाच वर्षांत भारतातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट करणारे अत्यंत महत्वाचा घटक ठरणारे धोरण आहे. भारतातील विविध संस्थांद्वारे जवळपास ५००० शेतकरी संस्थांना पाठबळ देण्यात आले आहे आणि बऱ्याच नवीन शेतकरी संस्था स्थापन केल्या जात आहेत. तेलगू भाषिक आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यात सुमारे ७०० शेतकरी संस्था आहेत. 'शेतकरी संस्था' चळवळ अजूनही प्राथमिक टप्प्यावर आहे, ज्यामध्ये शेतकरी संस्था संचालक मंडळ त्यांच्या प्रवर्तकांवर अवलंबून असते. संचालक मंडळाची स्वतःची दूरदृष्टी, व्यवसायाभिमुखता आणि क्षमता, मर्यादित असते कारण त्यांना दिले जाणारे प्रशिक्षण मर्यादित आहे. शेतकरी संस्थेसमोर बरीच आव्हाने आहेत जसे की, चांगल्या प्रशिक्षित आणि वचनबद्ध मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा अभाव, सुशासन, व्यवसायाचे व्यवस्थापन, प्रभावी व्यवस्था, वित्त आणि बाजारपेठेतील प्रवेश या घटकांची आव्हाने, तर सरकारी योजनांविषयीची अपुरी माहिती यासारख्या अनेक गोष्टींनाही सामोरे जावे लागत आहे. कृषी मूल्य साखळी विकासावर लक्षणीय रितीने प्रभाव पाडण्याची क्षमता शेतकरी संस्थासाठी फारच दूरची बाब आहे.

शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची पात्रता आणि क्षमता वाढवणे हे शेतकरी संस्थेच्या यशासाठी अत्यंत, गरजेचे आहे ज्यायोगे शेतीपासून नफा वाढविण्यासाठी तसेच सदस्य शेतकऱ्यांना आवश्यक असणारी सेवा देणारी व्यावसायिक संस्था म्हणून त्या विकसित होऊ शकतील. शेतकरी संस्था अध्यापन केंद्राच्या माध्यमातून शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाला सतत प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे, एपीएमएएससाठी प्राधान्याची गोष्ट आहे, कारण आपण मोठ्या प्रमाणात शेतकरी संस्थांना पाठबळ देण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि इतरांनी पाठबळ देवू केलेल्या शेतकरी संस्थांना मार्गदर्शन देत आहोत, ज्यायोगे योग्य कृषी मूल्य साखळी विकास उपक्रमांमध्ये त्या उपयुक्त ठरतील.

शेतकरी संस्थेवरील विद्यमान प्रशिक्षण पुस्तिका आणि अभ्यास संचांचा आढावा घेतल्यास, आम्हाला शेतकरी संस्था संचालक मंडळासाठी उच्च गुणवत्तेचे, व्यावहारिक आणि वापरासाठी सोपी स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका नसण्याची मोठी उणीव आढळली. स्वयंसहायता संस्थांच्या स्वयंनियमन विषयावरील स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच विकसित करण्याच्या आपल्या प्रचंड अनुभवावर आणि संस्था बांधकाम प्रशिक्षणातील १८ वर्षांच्या अनुभवाच्या आधारे श्री मधू मूर्ती आणि श्रीमती रामलक्ष्मी यांच्या नेतृत्वाखाली एपीएमएएस संघाच्या सहकार्याने एक वर्षाहून अधिक काळ काम करून, संसाधन संस्था, भागीदार

स्वयंसेवी संस्था, प्रशिक्षण संस्था आणि शेतकरी संस्थेचे प्रतिनिधी यांच्या साहाय्याने शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी १२ सुलभ वापर स्वयंअभ्यास पुस्तिका संच विकसित केला आहे. या संचामध्ये शेतकरी संस्थेची आवश्यकता आणि महत्त्व, संस्थात्मक रचना, सभासदत्व, नेतृत्व आणि शासन, व्यवस्थापन, नोंदणी आणि कायदेशीर अनुपालन, व्यवसाय नियोजन, उत्पादकता वर्धन, सामूहिक खरेदी विक्री (निविष्ठा आणि उत्पादन), शेती विषयक सेवा केंद्रांचे व्यवस्थापन, लेखा आणि वित्तीय व्यवस्थापन इत्यादींचा अंतर्भाव आहे.

शेतकरी संस्था ह्या नेहमीच लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या स्वायत्त व्यावसायिक संस्था असतात. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची आणि पदाधिकाऱ्यांची क्षमता वाढवण्याची सतत आवश्यकता असते कारण नियमित निवडणुकीमुळे त्याच्यात बदल होत असतो. आम्हाला खात्री आहे की हे वापरण्यास सुलभ असे स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच शेतकरी संस्थांना त्यांच्या सदस्यांसाठी व्यवहार्य संस्था बनविण्यासाठी सक्षम करतील. स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच शिकण्यासाठी शेतकरी संस्थेच्या प्रवर्तकांना पद्धतशीरपणे शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. शेतकरी संस्थेचे प्रवर्तक आणि इतर भागधारक यांच्यासाठीही शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संचाचा प्रभावीपणे वापर करता येईल ज्यायोगे शेतकरी संस्थेच्या स्वयं–व्यवस्थापित आणि व्यवहार्य व्यवसाय संस्था होण्यासाठी सक्षम बनतील. एपीएमएएसने तेलगू आणि इंग्रजीमध्ये या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, परंतु आवश्यकतेप्रमाणे या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संचांचे संसाधन संस्था, राज्य सरकारे, नाबार्ड आणि प्रशिक्षण संस्था योग्य प्रकारे इतर भारतीय भाषांमध्ये रुपांतर करू शकतात. एपीएमएएस अशा प्रयत्नांना नक्कीच पाठिंबा देईल. ह्या पुस्तिकांचे मराठी भाषांतर करण्यासाठी बाएफ संस्था, पुणे आणि श्री. शिरीष जोशी, श्री. गिरीश जोशी, पुणे यांनी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल मनपूर्वक आभार! आपल्या अभिप्रायासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत.

आपला

**सी. एस. रेड्डी**

मुख्य कार्यकारी अधिकारी

एपीएमएएस

# अनुक्रमणिका


शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी स्वयंशिक्षण पुस्तिका संच कशासाठी? ३

ह्या पुस्तिकेसंबंधी ६

परिभाषा / लघुरूपे ८

सुरुवात करण्यापूर्वी ११

१. शेतीची परिस्थिती आणि एकत्रित कृतीची आवश्यकता १२

२. शेतकरी संस्था – अर्थ, मूल्ये आणि तत्त्वे २१

३. शेतकरी संस्था – मुख्य वैशिष्ट्ये ४२

४. नोंदणी – गरज आणि महत्त्व ४७

परिशिष्ट १: सहकाराची तत्वे तपशीलवार ५२

स्वयंमूल्यमापन ५५

# ह्या पुस्तिकेसंबंधी

## संचालकांसाठी अभ्यास पुस्तिका संच


१. शेतकरी संस्था : परिचय आणि गरज

२. शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना

३. शेतकरी संस्थेचे सभासदत्व

४. शेतकरी संस्थेमधील शासन

५. शेतकरी संस्थेचे व्यवस्थापन

६. शेतकरी संस्थेच्या कायदेशीर बाबीची पूर्तता

७. व्यवसाय योजना

८. लेखा आणि वित्त

९. कापणी नंतरचे मूल्य साखळी व्यवस्थापन

१०. विपणन

११. उत्पादकता वृद्धी सेवा

१२. नेतृत्व


**शेतकरी संस्था परिचय आणि गरज :** शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांसाठी स्वयंशिक्षण पुस्तिकेच्या मालिकेतील पहिल्या क्रमांकाची ही पुस्तिका आहे. ही पहिली पुस्तिका असल्याने, शेतकरी संस्थेच्या प्रभावी कार्याबद्दल शिकण्यासाठीचा पाया यात घातला गेला आहे.

**उद्देश**

या पुस्तिकेचा हेतू शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळ सदस्यांना आवश्यक ज्ञान घेण्यास सक्षम बनविणे आहे, जेणेकरून ते प्रभावीपणे आपली भूमिका बजावू शकतील आणि त्यांच्या शेतकरी संस्थांना चैतन्यपूर्ण आणि त्यांच्या सदस्यांसाठी उपयोगी बनण्यास मदत करेल.

**लक्ष्य गट**: ही पुस्तिका शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांसाठी आहे. संचालक मंडळ सदस्यांना त्यांची शेतकरी संस्था चालविण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा.

**शिकण्याचे उद्दिष्ट**

शेतकरी संस्थेवरील या प्राथमिक पुस्तिकेची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- सामूहिक कृतीची गरज, शेतकरी संस्थेची मुख्य वैशिष्ट्ये समजून घेणे
- नोंदणीची गरज आणि विविध कायद्यान्वये नोंदणीचे प्रकार समजून घेणे
- शेतकरी संस्थेसाठी सहकाराची मूल्ये आणि तत्त्वे / परस्पर सहाय्य तत्त्वांविषयी जाणीव जागृती साहाय्य करणे

**रचना आणि सामग्री**

ही अभ्यास पुस्तिका शेतीतील आव्हानांपासून सुरू होते, ज्या दूर करण्यासाठी सामूहिक कृतीची आवश्यकता आहे. अशा एकत्रित कारवाईसाठी योग्य संस्थात्मक प्रकार म्हणजे शेतकरी संस्था. त्यापुढील भाग म्हणजे शेतकरी संस्थेचा अर्थ आणि मुख्य वैशिष्ट्ये. या पुस्तिकेची सर्वात महत्वाची बाब म्हणजेच सहकाराची मूल्ये आणि तत्त्वे जी शेतकरी संस्थांनी स्वीकारली पाहिजेत.

**पुस्तिका कशी वापरावी ?**

संचालक मंडळाचे सदस्य हा अभ्यास संच स्वतः वापरू शकतात किंवा बाहेरील व्यक्तींकडून शिकण्याची सोय करू शकतात. या संचांसोबत, योग्य त्या ठिकाणी या अभ्यास संचासंबंधित फलक आहेत जे संचालक मंडळाचे सदस्य, शिक्षणासाठी कामाच्या ठिकाणी प्रदर्शित करू शकतात.

आम्ही अपेक्षा व्यक्त करतो कि आपण या अभ्यासक्रमाच्या शिक्षणाचा आनंद घ्याल आणि आपल्या शेतकरी संस्थेचे अधिक प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने व्यवस्थापन कराल.

# परिभाषा / लघुरूपे

**घटना (एओए)** : सहकारी संस्थेसाठीच्या नियमावली प्रमाणे शेतकरी उत्पादक कंपनीसाठी आर्टिकल्स ऑफ असोसिएशन (एओए) आहेत. ही घटना कंपनीच्या संचालनाचे नियम स्पष्ट करते आणि कंपनीचे उद्दीष्ट आणि हेतू साध्य करण्याचे मार्ग स्पष्ट करते.

संचालक मंडळाला घटना तयार करावी लागेल आणि त्यांला कंपनी रजिस्ट्रारकडून मान्यता घ्यावी लागेल. घटनेमध्ये दुरूस्ती केल्यास ती दुरुस्ती कंपनी रजिस्ट्रारकडून मंजूर करून घ्यावी लागेल.

**सक्रिय सदस्य** : जो सदस्य शेतकरी संस्थेच्या सदस्यत्वाच्या जबाबदारीचे आणि नियमावलीचे निकष पूर्ण करतो.

**बोर्ड / संचालक मंडळ (बीओडी)** : धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता आणि शेतकरी संस्था आपल्या सदस्यांसाठी कार्य करते याची खात्री करण्यासाठी, संचालक मंडळ ही शेतकरी संस्थेची प्रशासकीय समिती आहे. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची स्थापना सर्वसाधारण सभा अर्थात शेतकरी संस्थेच्या सदस्यांद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींद्वारे केली जाते.

**नियमावली** : नियमावली ही सहकारी संस्थेचे कार्य सक्षम करण्यासाठीचा नियमांचा एक संच आहे. प्रत्येक सहकारी संस्थेची स्वतःची नियमावली असते आणि सहकारी संस्थेची सर्व कामे त्या नियमावली च्या कक्षेत करावी लागतात.

संचालक मंडळाला घटना तयार करावी लागते आणि त्या नियमावलीला सहकार निबंधकांकडून मंजूरी घ्यावी लागते. नियमावलीत कोणतीही सुधारणा केवळ सर्वसाधारण सभेद्वारेच केली जाऊ शकते आणि सहकार निबंधकांकडून त्याला मंजुरी घ्यावी लागेल.

**बॉडी कॉर्पोरेट** : बॉडी कॉर्पोरेट ही एक औपचारिक, मान्यता प्राप्त संस्था आहे जिला मालमत्ता संपादन, प्रशासन आणि ती बरखास्त करणे, करार करणे, खटला भरणे आणि इतर उद्दीष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करण्याचा अधिकार आहे. नोंदणीनंतर शेतकरी संस्था बॉडी कॉर्पोरेट होईल.

**सहकारी संस्था** : सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत शेतकरी संस्थेला (उदा. महाराष्ट्र सहकारी कायदा १९६०) सहकारी संस्था म्हणतात.

**समभाग** : शेतकरी संस्थेच्या मालमत्तेसह एकूण स्वतःच्या मालकीच्या वित्तीय स्त्रोतांना समभाग मानले जाईल हे स्पष्ट आहे की शेतकरी संस्थेच्या चांगल्या आर्थिक स्थितीसाठी मोठ्या प्रमाणात समभाग असावेत.

**एफपीओ (शेतकरी संस्था)** : शेतकरी संस्था ही एक नोंदणीकृत संस्था आहे जी तिच्या शेतकरी सदस्यांच्या मालकीची आणि नियंत्रणाखाली असते शेतकरी संस्थेचा उद्देश तिच्या सदस्यांना आवश्यक सेवा देऊन त्यांच्या सामूहिक गरजा भागविणेहा आहे. शेतकरी संस्था शेती आणि संबंधित क्षेत्रात वेगवेगळ्या कामांमध्ये सहभागी होतात. शेतकरी संस्था ही औपचारिक संस्था असल्याने तिचे कार्यालय आणि त्याला पायाभूत सुविधा, कर्मचारी, यंत्रणा असणे आवश्यक आहे आणि संचालक मंडळाने ती संस्था नियंत्रित केली पाहिजे. या पुस्तिकेमध्ये एफपीओला शेतकरी संस्था असा शब्द वापरला आहे.

**सर्वसाधारण मंडळ (जीबी)** : शेतकरी संस्थेच्या सर्व सदस्यांना त्या शेतकरी संस्थेचे सर्वसाधारण मंडळ असे संबोधले जाते. शेतकरी संस्थेमध्ये सर्वसाधारण मंडळाला सर्वोच्च अधिकार असतात.

**जीएसटी** : वस्तू व सेवा कर (जीएसटी) – म्हणजे वस्तू आणि सेवांवर एक व्यापक कर जो भारतात एकसारखा असतो.

**मर्यादित परतावा** : लिमिटेड रिटर्न म्हणजे उत्पादक कंपनीच्या घटनेनुसार निर्दिष्ट केलेला जास्तीत जास्त लाभांश.

लाभांश / व्याज एक वर्ष मुदत ठेवींवर राष्ट्रीयकृत बँकांकडून दिल्या जाणाऱ्या व्याज दरापेक्षा कमी किंवा त्या समान असला पाहिजे.

**बहुराज्य सहकारी संस्था अधिनियम २००२** : या कायद्यानुसार केवळ एका राज्यापुरत्या मर्यादित नसलेल्या सहकारी संस्थांची निर्मिती केली जाते. स्वयंसेवा आणि परस्पर मदतीवर आधारित लोकांची संस्था म्हणून सहकारी संस्थांची निर्मिती करून त्यांना लोकशाही पद्धतीने कामकाज करण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यांची आर्थिक आणि सामाजिक उन्नती होण्यासाठी सक्षम करणे,तसेच कार्यात्मक स्वायत्तता प्रदान करणे ही कायद्याची उदीष्टे आहेत.

हा कायदा केंद्र शासनाच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, शासनाद्वारे अनुशासित केला जातो.

| | | |
|---|---|---|
| **परस्पर सहाय्य तत्वे (एमएपी)** | : | कंपनी अधिनियम (कायदा), २०१३ च्या कलम ५८१जी च्या पोट–कलम (२) मध्ये नमूद केलेली तत्वे जी उत्पादक कंपनीने त्यांच्या संस्थेच्या घटनेद्वारे स्वीकारली पाहिजेत. |
| **स्वयंसेवी संस्था (बिगर सरकारी संस्था)** | : | बिगर सरकारी संस्था ही एक स्वयंसेवी विकास संस्था आहे, जी शेतकरी संस्था तयार करणे, तिचे मजबुतीकरण आणि ती टिकवून ठेवण्याचे काम करते. |
| **पॅन** | : | स्थायी खाते क्रमांक (पॅन) – आयकर विभागाने आयकर नियंत्रित करण्यासाठी व्यक्ती आणि नोंदणीकृत संस्थांना दिलेला एक विशिष्ट क्रमांक आहे. |
| **उत्पादक कंपनी** | : | कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी संस्थेला उत्पादक कंपनी म्हटले जाते. उत्पादक कंपनी म्हणजेच कंपनी कायदा २०१३ च्या कलम ५८१ ब मध्ये निर्दिष्ट केलेल्या हेतूने आणि निर्दिष्ट उपक्रम करणारी बॉडी कॉर्पोरेट. जी कंपनी म्हणून नोंदणीकृत असणारी संस्था होय. |
| **आश्रयदाता** | : | शेतकरी संस्थेच्या सभासदांनी शेतकरी संस्थेच्या व्यवस्थापित कामकाजात भाग घेऊन तिच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवांचा केलेला उपयोग. |

# सुरुवात करण्यापूर्वी

आधीच्या विभागात दिल्याप्रमाणे हि पुस्तिका शेतकरी संस्था या विषयाशी निगडीत आहे.

या विषयावरील काही मूलभूत प्रश्न खाली दिले आहेत. चला या प्रश्नांची स्वत: उत्तरे देऊया. या चाचणीचा उद्देश हा संबंधित प्रश्नांवरील आपल्या सध्याच्या आकलनाचे मूल्यांकन करणे आणि अशा प्रकारे या बद्दल अधिक जाणून घेणे हा आहे.

१. शेतकऱ्यांच्या एकत्रित कृतीची काय गरज आहे?

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

२. शेतकरी संस्था म्हणजे काय?

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

३. शेतकरी संस्था कोणाच्या मालकीची असते ?

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

४. नियमावलीचा अर्थ काय आहे?


.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

## १

# शेतीची परिस्थिती आणि एकत्रित कृतीची आवश्यकता

### सत्र उद्देश




**सामूहिक कृतीची गरज आणि फायदे याबद्दल समजून घेणे.**

### मुख्य आशय


१. शेतीतील अडचण आणि सामूहिक कृतीची आवश्यकता
२. सामूहिक स्तरावर उपक्रम
३. एकत्रिकरणासाठी संस्थात्मक रचना

श्याम हा नरसापूर गावातील एक छोटा शेतकरी आहे. त्याच्याकडे दोन एकर जमीन आणि एक म्हैस आहे. त्याला शाळेत जाणारी दोन मुले आहेत. श्याम आणि त्याची पत्नी लक्ष्मी दोघेही शेतकरी आहेत, तसेच इतर शेतात मजुरीचे काम करतात. श्यामच्या शेतीसाठी सिंचनाची सुविधा नसल्याने ते पावसावर अवलंबून आहेत. बियाणे पुरवठा करणाऱ्यांपैकी एका व्यक्तिच्या सूचना आणि सल्ल्यानुसार गेल्या खरीप हंगामात श्यामने जास्त किंमत देऊन अधिक उत्पन्न देणाऱ्या लाल हरभऱ्याच्या एका वाणाची निवड केली.



परंतु या बियाण्यांपैकी फक्त ५०% बियाणेच उगवले. स्वतःचे अपूर्ण ज्ञान आणि सहकारी शेतकऱ्यांचा प्रभाव यामुळे श्यामने रासायनिक

खतांचा जास्त प्रमाणात वापर केला ज्यामुळे जास्त खर्च आला. शेतात यंत्रसामग्रीचा अभाव आणि कामाचा ताण असल्यामुळे श्याम वेळेवर तण काढू शकला नाही, त्यामुळे उतारा कमी आला. आणखीन पदरमोड करून जेव्हा त्याने आपले उत्पादन बाजारात आणण्याचा प्रयत्न केला तेव्हा बाजारात जास्त आवक असल्यामुळे किंमतीत घट झाली. श्याम आता आगामी खरीप हंगामात कोंडीत सापडला आहे.




आपणही शेतीत अशाच प्रकारच्या अडचणींचा सामना करत आहोत? आपण याबद्दल काय करू शकतो?

श्याम आपल्या शेतीतील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न कसा करतो ते पाहूया.

एक दिवस विकास नावाच्या स्वयंसेवी संस्थेने खेड्यात येऊन शेतकऱ्यांशी शेतीची सद्यस्थिती व त्यांना येणाऱ्या अडचणींबद्दल चर्चा सुरू केली. विकास संस्थेच्या प्रतिनिधींनी संबंधीत शेतकऱ्यांसोबत प्रचार सभा आयोजित केल्या. रमेश श्यामच्या मित्रांपैकी एक आहे. त्याने श्यामला त्यांच्याबरोबर प्रचारसभेमध्ये येण्याची विनंती केली. श्याम देखील बैठकीस उपस्थित होता.सभेदरम्यान घडलेली चर्चा पाहूया.

नरसापूर गाव व परिसरातून जवळपास ५५ शेतकरी ग्रामपंचायत कार्यालयात जमले. श्रीमती सरस्वती ज्या विकास स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधी आणि परिसरातील नामांकित विकास कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध आहेत, त्यांनी सगळ्या शेतकऱ्यांचे स्वागत केले. परिचयानंतर सरस्वती म्हणाल्या की, आम्ही एक शेतकरी म्हणून आपल्या शेतात दिवसरात्र आपल्या कुटुंबाच्या पालन पोषणासाठी राबतो आणि इतरांनाही धान्य पुरवतो. आपल्याकडे स्वत: साठी पुरेसे अन्न नसले तरी आम्ही पिकाची काळजी घेतो. आपल्या पिकासाठी सर्व काही काळजीपूर्वक करतो. आपण करीत असलेली शेती आपल्या कुटुंबासाठी केवळ उपजीविकेचा मार्गच नाही, तर ते अन्न, चारा आणि इंधन यांचा मुख्य स्त्रोत देखील आहे. शेती हा आपल्या देशाचा कणा आहे. म्हणूनच आम्ही या जगातील सर्वात महत्त्वाच्या लोकांपैकी एक आहोत.

नंतर श्रीमती सरस्वती म्हणाल्या की आपण उत्पादनासाठी केवळ पावसावर अवलंबून न रहाता हळूहळू लवचिकता वाढवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत, तरीही आपल्याकडे अजूनही अनेक अडचणी आहेत. आपल्या खेड्यात /तालुक्यामध्ये शेतीमध्ये येणाऱ्या अडचणींची यादी करण्यास त्यांनी

त्यांना सांगितले तसेच खेड्यात /तालुक्यमध्ये शेतीच्या तीन यशस्वी / चांगल्या कामांची नोंद करण्यास त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले:

| **आपल्या क्षेत्रातील शेतीच्या अडचणी** | **आपल्या भागात शेती यशस्वी झाल्याची उदाहरणे** |
|---|---|
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |

चर्चेतून असे दिसून आले की वैयक्तिक शेतकरी शेतीत अनेक अडचणी आहेत. तथापि, अशा काही अडचणी दूर करण्याच्या यशोगाथा आणि संधी देखील आहेत.


त्यानंतर श्रीमती सरस्वती यांनी विचारले: वैयक्तिक शेतकरी पातळीवर कृती करून शेतीतील अडचणी दूर करणे शक्य आहे काय? जवळजवळ सर्वच शेतकऱ्यांनी ठामपणे नाही, शक्य नाही असे सांगितले. अशा प्रकारे श्रीमती सरस्वती यांनी शेतकऱ्यांना खालील पोस्टर दाखवून शेतीतील अडचणी दूर करण्यासाठी सामूहिक कृती करण्याची गरज असल्याचे सांगितले.

# शेतकऱ्यांची वैयक्तिक आणि सामूहिक परिस्थिती

## वैयक्तिकपणे काम केल्यामुळे येणारे निर्बंध





## एकत्रितपणे काम केल्याचे फायदे



चर्चेतून, शेतकऱ्यांनी असे आश्वासन दिले की पुढील प्रकारची कामे सामुहिक स्तरावर करता येतील. (सामुहिक पातळीवरील समूहाने एकत्रित करता येण्यासारखी कामे)

# सामुहिक पातळीवरील कामे



त्यानंतर श्रीमती सरस्वती यांनी शेतकऱ्यांना एकत्रितपणे उपक्रम केल्यामुळे होणाऱ्या फायद्यांची यादी करण्याची सूचना केली.

आपला समूह आम्हाला कमी किंमतीत अधिक सेवा मिळविण्यात मदत करेल, भांडवली खर्च कमी करू शकेल, चांगले सौदे करण्याची शक्ती येईल आणि आपला सामूहिक आवाज प्रबळ होईल.

## शेतकरी संस्था – सामूहिक कृतीचा संस्थात्मक प्रकार

बैठकीत उत्सुकतेने ऐकत असलेल्या सुदर्शनने विचारले, सामूहिक कृती करण्यास कोणता मार्ग / व्यवस्था आहे?

श्रीमती सरस्वती यांनी आत्मविश्वास पूर्वक उत्तर दिले: हा एक अतिशय महत्वाचा आणि चांगला प्रश्न आहे.

पूर्वी यादी केल्या केल्याप्रमाणे सामूहिक पातळीवर भिन्न कामे करण्यासाठी, आपल्याकडे औपचारिक, कायदेशीर अस्तित्व असणे आवश्यक आहे. एक शेतकरी संस्था सामूहिक कृतीसाठी अतिशय योग्य आणि प्रभावी संस्था आहे.

श्रीमती सरस्वती पुढे म्हणाल्या, शेतकरी संस्था ही आपली स्वतःची संस्था आहे – स्वतःच्या मालकीची, स्वयं नियंत्रित आणि जिचे सदस्य शेतकरी स्वत: व्यवस्थापन करतात. शेतकरी संस्था त्यांच्या सदस्यांना – बियाण्यापासून कापणीपर्यंत, अशा विविध प्रकारच्या सेवा देऊ शकतात. शेतकरी संस्था हे सहकारी तत्वे आणि व्यवसायिक दृष्टिकोनावर आधारित असाव्यात. शेतकरी संस्थेचे उद्दिष्ट त्यांच्या सदस्य शेतकऱ्यांचा विकास करण्यासाठी दर्जेदार निविष्ठा, सुधारित उत्पादन तंत्रज्ञान, पिकांवर प्रक्रिया, विपणन पुरविणे इ. आहे.

शेवटी श्रीमती सरस्वती यांनी शेतकऱ्यांना विचारले, त्यांनी काय निर्णय घेतला आहे? त्यांना त्यांची शेतकरी संस्था स्थापित करायची आहे की नाही?

५५ शेतकऱ्यांपैकी जवळपास ३० शेतकऱ्यांनी शेतकरी संस्था बनविण्यास सहमती दर्शविली आणि उर्वरित शेतकऱ्यांनी विचार करण्यास थोडा वेळ हवा असल्याचे नमूद केले. नंतर श्रीमती सरस्वती यांनी असे सुचवले की जे शेतकरी संस्था तयार करण्यास इच्छुक आहेत त्यांनी शेतकरी संस्थेची मुख्य वैशिष्ट्ये आणि शेतकरी संस्थेमधील सदस्यत्व यावर चर्चा करण्यासाठी पुन्हा भेटावे. श्रीमती सरस्वती यांच्या आभार प्रदर्शनानंतर बैठक संपली.

उत्साही शेतकरी संस्था स्थापन करण्यासाठी आले आणि इतर शेतकऱ्यांना शेतकरी संस्थेमध्ये सदस्य म्हणून सामील होण्यासाठी त्यांनी प्रेरित केले. विकासच्या सहकार्याने त्यांनी वस्तीनिहाय जनजागृती सभा आयोजित केल्या आणि शेतकऱ्यांना पुढील पत्रके वाटली.

सहकारी शेतकऱ्यांच्या प्रेरणेने श्याम देखील शेतकरी संस्थेमध्ये दाखल झाला.

# शेतकरी बंधू व भगिनींना
# शेतकरी संस्थेला लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवाहन

## पार्श्वभूमी

सामान्यपणे हे माहिती आहे की शेतकऱ्याला प्रत्येक स्तरावर शेतीच्या बऱ्याच मूलगामी अडचणी आहेत. या अडचणींमध्ये सुधारित तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि मूल्यवर्धन, साठवण सुविधा या सगळ्यांची कमतरता, लागवडीच्या खर्चात मोठी वाढ, अत्यल्प मोबदला, तरुणांनी शेतीकडे फिरवलेली पाठ इ. या अडचणींमुळे उत्पादकांना सातत्याने कमी उत्पादन, कमी उत्पन्न आणि ग्राहक मूल्यात कमी वाटा मिळतो.

दुसरीकडे, सर्वच खाद्यपदार्थ व शेती उत्पादनांची मागणी ग्राहक स्तरावर सतत वाढत आहे. उच्च प्रतीच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनांच्या मागणीत ही भरपूर वाढ झाली आहे.

शेती व्यवसायासमोरील अडचणींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी आणि येवू घातलेल्या विविध संधींचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना सामूहिक स्तरावर बरेच उपक्रम राबवावे लागतात.

## शेतकरी संस्था

वरील पार्श्वभूमीमुळे शेतकरी संस्थेला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. शेतकरी संस्थाही शेतकऱ्यांच्या एकत्रिकरणासाठी अतिशय प्रभावी संस्थात्मक प्रकार आहे. शेतकरी संस्था विविध कार्ये जसे की प्रक्रिया करणे, मूल्य वर्धन, साठवण, विक्री, वित्तपुरवठा, विविध निविष्ठा पुरवठा, बियाणे उत्पादन इ. एकत्रितपणे करण्यासाठी उपयुक्त ठरतात.

शेतकरी संस्था एक स्वायत्त उपक्रम आहे ज्यात केवळ आपल्या गावांतील /तालुक्यातील शेतकरी संस्थेचे सदस्य होऊ शकतात. अशाप्रकारे, शेतकरी संस्था ही शेतकरी संस्थेचे सदस्य म्हणून स्वेच्छेने आलेल्या शेतकऱ्यांच्या स्वतःच्या मालकीची आणि नियंत्रणाखाली असते.

शेतकरी संस्था सरकारकडे कायदेशीररीत्या नोंदणीकृत असते.

## शेतकऱ्यांना शेतकरी संस्थेचा लाभ

* शेतकऱ्यांच्या उत्पादनांची विक्री सेवा
* उत्पादनांसाठी स्पर्धात्मक किंमत
* विपणन खर्च कमी करणे
* लाभांश आणि बोनस
* गुंतवणूक खर्च कमी करणे
* दर्जेदार बियाणे आणि सेंद्रिय निविष्ठाची अधिक उपलब्धता
* शेतकरी संस्थेच्या साठवण, प्रक्रिया सुविधा आणि कृषी विषयक आधुनिक साधनांचा वापर
* शेतकरी संस्थेमार्फत उत्पादन तंत्रज्ञान व प्रशिक्षण मिळवणे

शेतकरी संस्थेचे सदस्य झाल्यानंतर तुम्हाला नियमितपणे शेतकरी संस्थेच्या सर्वसाधारण सभेस (जी ६ महिन्यातून एकदा आयोजित करणे आवश्यक आहे) तसेच सर्व प्रशिक्षण आणि प्रचार सभांना उपस्थित राहणे आवश्यक आहे आणि (त्यांनीच ठरविलेल्या घटनेच्या आधारे) शेतकरी संस्थेशी दर वर्षी काही किमान व्यवहार करणे आवश्यक आहे.


## पुढील वाटचाल

वरील बाबी लक्षात घेता शेतकरी बंधू आणि भगिनींनो, भागभांडवल आणि सदस्यता शुल्क भरून आपल्या शेतकरी संस्थेमध्ये सदस्य म्हणून सामील व्हा. शेतकरी संस्थेच्या कार्यात सक्रियपणे सहभाग घ्या, आपल्या शेती व्यवसायावर नियंत्रण प्रस्थापित करा आणि अशा प्रकारे आपली शेती आपल्या कुटुंबियांसाठी अधिक किफायतशीर करा.

२

# शेतकरी संस्था –<br>अर्थ, मूल्ये आणि तत्त्वे

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेचा अर्थ आणि मुख्य वैशिष्ट्यांविषयी समजून घेण्यासाठी**

### मुख्य आशय

१. शेतकरी संस्था म्हणजे काय?
२. शेतकरी संस्थेची वैशिष्ट्ये
३. शेतकरी संस्थेची तत्वे आणि मूल्ये

विकास स्वयंसेवी संस्थेने तालुका मुख्यालयातील सर्व गावांमधील काही इच्छुक प्रवर्तक शेतकऱ्यांसाठी बैठका आयोजित केल्या. नरसापूर येथील रमेश व सुदर्शन यांनीही बैठकांना हजेरी लावली. त्यांच्या मनात थोड्या शंका असल्या तरी इतर अनेक खेड्यांतील इतर प्रवर्तक शेतकऱ्यांना पाहून ते उत्साही आहेत आणि कार्यक्रमाची कार्यवाही ऐकण्यास उत्सुक आहेत.

कार्यकर्त्यांनी गावपातळीवरील प्रचार बैठकांमध्ये – शेतीतील अडचणी आणि संधी, एकत्रितपणे विविध उपक्रम राबविण्यासाठी औपचारिक संस्था म्हणून शेतकरी संस्था आणि अडचणी दूर करण्यासाठी सामूहिक कार्यवाही करण्याची आवश्यकता या पैलूंवर चर्चा सुरू केली. त्यानंतर त्यांनी शेतकरी संस्थेचा अर्थ आणि मुख्य वैशिष्ट्ये सांगितली. कार्यकर्त्यांनी त्याच जिल्ह्यातील दुसऱ्या तालुक्यात विकास संस्थेने पाठबळ दिलेल्या भूमाता या शेतकरी संस्थेच्या उदाहरणांचा वापर केला.

## भूमाता शेतकरी संस्था

भूमाता शेतकरी संस्था नऊ महिन्यांपूर्वी तालुका मुख्यालयातील नोंदणीकृत कार्यालयात नोंदणीकृत केली गेली. सुमारे ५०० शेतकरी, मुख्यत: अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांनी, प्रत्येकी १००० रुपये

भागभांडवल देऊन शेतकरी संस्थेमध्ये सदस्यता घेतली. अशा प्रकारे, शेतकरी संस्थेची मालकी या ५०० सदस्यांकडे आहे. ५०० सदस्यांपैकी ४००, क्रियाशील सदस्यांनी तिच्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये भाग घेतला, लोकशाही पद्धतीने त्यांच्या संचालक मंडळाची सक्रियपणे निवड केली, नियमावली पारित केली आणि पुढील वर्षासाठी योजना निश्चित केली. योजनेत सदस्यांना दर्जेदार बियाणे पुरवठा करण्याच्या सेवा आणि सदस्यांच्या उत्पादनाचे सामूहिक विपणन या गोष्टींना प्राधान्य दिले गेले आहे, कारण त्या बहुतेक सर्व सदस्यांच्या सर्वात जास्त महत्वाच्या गरजा आहेत.

त्यांच्या कार्यालयात लेखापुस्तके ठेवण्यासाठी जागा, एक संगणक, टेलिफोन आणि काही फर्निचर आवश्यक होते. शेतकरी संस्थेने व्यवस्थापकाची भरती देखील केली. शेतकरी संस्थेने दैनंदिन कामकाजासाठी तिच्या नावावर व्यावसायिक करासाठी वस्तू व सेवा कर (जीएसटी क्रमांक) साठी तसेच आयकरासाठी परमनंट अकाउंट नंबर (पॅन) कार्डही घेतले.

## शेतकरी संस्था – अर्थ

वरील यशोगाथा सादर केल्यानंतर विकास स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींनी शेतकऱ्यांना विचारले की, भूमाता शेतकरी संस्थेचा उद्देश काय आहे असे तुम्हाला वाटते?

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

वरील यशोगाथेतून हे समजू शकते की शेतकरी संस्था ही औपचारिक, नोंदणीकृत संस्था असते जी तिच्याच सदस्यांद्वारे नियंत्रित आणि व्यवस्थापित केली जाते. शेतकरी संस्थेचा उद्देश सदस्यांच्या सामूहिक गरजा भागविणे आहे.

शेतकऱ्यांकडून उत्तरे मिळाल्यानंतर प्रतिनिधीने शेतकरी संस्थेचा अर्थ खालीलप्रमाणे सांगितला.

शेतकरी संस्था ही संयुक्त मालकी असलेली आणि लोकशाही पद्धतीने नियंत्रित उपक्रमातून त्यांच्या सामान्य आर्थिक गरज्यांची पूर्ती करण्यासाठी स्वेच्छेने संघटित होणाऱ्या उत्पादकांची एक स्वायत्त संस्था आहे. परस्पर फायद्यासाठी शेतकरी संस्था सभासदांच्या सामूहिक हिताची सेवा देते

**त्यांनी थोडक्यात शेतकरी संस्थेचे वेगळेपण नमूद केले.**

- ❇ सदस्य मालक आहेत
- ❇ सदस्य वापरकर्ते आहेत
- ❇ वापरकर्ते नियंत्रक आहेत
- ❇ वापरकर्ते लाभार्थी आहेत


## शेतकरी संस्थेची मूल्ये आणि तत्त्वे

शेतकरी संस्थेच्या प्रवर्तकांचे प्रशिक्षण सुरु आहे, ज्यामध्ये रमेश आणि सुदर्शन उपस्थित आहेत! हे एक महत्त्वपूर्ण सत्र आहे, ज्यात सहकारी मूल्ये आणि सहकारी तत्त्वे समजावली जातात. हे सत्र सुलभ करण्यासाठी विकास एनजीओने बाह्य तज्ञही आणले. आता, शेतकरी संस्था तयार झाल्यावर त्यांना सहकारी मूल्ये आणि सहकारी तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. आता आपण सहकारी मूल्ये आणि सहकारी तत्त्वांचा तपशील घेऊ.

## सहकारी मूल्ये

कोणत्याही शेतकरी संस्थेने अंगीकारण्याची मूल्ये खालीलप्रमाणे आहेत.

आकृती १: सहकारी मूल्ये



### स्वमदत

आम्ही सदस्य म्हणून एकत्र येऊन आपले कुटूंब, आपले गाव, आपला ब्लॉक आणि स्थानिक पातळीवरही सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न करू.

### स्वयं–जबाबदारी

आमच्या शेतकरी संस्थेची अपेक्षा आहे की सदस्यांनी तिच्या पोट–नियम आणि व्यवसाय नियमांनुसार किमान जबाबदाऱ्या पूर्ण केल्या पाहिजेत. आमची शेतकरी संस्था यशस्वी करण्यासाठी उपक्रमांना पाठिंबा देऊन आणि त्या सेवांचा वापर करून पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. आम्ही इतर सदस्यांनाही त्याचे समर्थन करण्यास प्रोत्साहित केले पाहिजे.

### लोकशाही

सहसा कोणत्याही व्यवसाय संस्थेत मतदानाची शक्ती गुंतवणूकीवर आधारित असते. परंतु आमच्या शेतकरी संस्थेमध्ये सर्व सदस्य समान आहेत. मतदानाची शक्ती विकत घेऊ शकत नाही. येथे एक सदस्य, एक मत आहे.

### समानता

आमच्या शेतकरी संस्थेमध्ये सर्व सदस्यांना सहभागाची समान संधी आहे, जसे की वाजवी व्यापारासाठी मोहीम करणे.

### समता

आमच्या शेतकरी संस्थेने सर्व बाबींमध्ये निष्पक्षतेसाठी वचनबद्धता दाखविली पाहिजे. आम्ही संस्था चालविण्यासाठी आवश्यक संसाधने रोख अथवा स्थावर प्रकारात ठेवू.

### एकता

आम्ही एकत्र आहोत म्हणून मजबूत आहोत, त्यामुळे आमची शेतकरी संस्था अधिक मजबूत होण्यास मदत करण्यासाठी आम्ही संघटित राहू.

आमच्या मूल्यांच्या आधारे वरील बाबींचा अभ्यास केल्यावर, मूल्ये आमलात आणण्यासंदर्भात आपल्या स्वतःच्या शेतकरी संस्थेचे मूल्यांकन करूया.

| मूल्य | प्रात्यक्षिक<br>होय / नाही / माहित नाही | आपण कोणत्या पद्धतीने ओळखू शकता |
|---|---|---|
| स्वत:ची मदत | | |
| स्वत:ची जबाबदारी | | |
| लोकशाही | | |
| समानता | | |
| समता | | |
| एकता | | |

## सहकारी तत्त्वे

सहकारी संस्था असो किंवा कंपनी असो, शेतकरी संस्थांना काही सहकारी तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे, जी जगभरात चांगल्या पद्धतीने मांडली गेली आहेत आणि स्वीकारार्ह झाली आहेत. अनेक सहकारी कायद्यांमध्ये असेही म्हटले आहे की सहकारी संस्थांनी सहकाराच्या तत्त्वांचा अंगीकार केला पाहिजे. ही तत्त्वे खाली दर्शविली आहेत.

## आकृती २ – सहकारी तत्वे

### तत्त्व १: **ऐच्छिक व मुक्त सदस्यत्व**

सहकारी संस्था स्वयंसेवी संस्था आहेत, ज्या लिंग, सामाजिक, वांशिक, राजकीय किंवा धार्मिक भेदभाव न करता त्यांच्या सेवांचा वापर करण्यास सक्षम असणाऱ्या, सदस्यता घेत असलेल्या आणि जबाबदाऱ्या स्वीकारण्यास इच्छुक असलेल्या सर्वांसाठी खुल्या आहेत.




### तत्व २: **लोकशाही (पद्धतीने) सदस्य नियंत्रण**

सहकारी संस्था ह्या त्यांच्या सदस्यांद्वारे नियंत्रित लोकशाही संस्था आहेत, ज्या आपली धोरणे ठरविण्यात आणि निर्णय घेण्यात सक्रियपणे भाग घेतात. मंडळ सदस्यास उत्तरदायी आहे. प्राथमिक सहकारी संस्थांमध्ये सदस्यांना समान मतदानाचे हक्क असतात (एक सदस्य, एक मत) आणि इतर स्तरावर सहकारी (तत्वावर) देखील लोकशाही पद्धतीने आयोजित केल्या जातात.



## तत्व ३: **सदस्य आर्थिक सहभाग**



सहकारी संस्था ह्या त्यांच्या सदस्यांकडून सहकाराच्या माध्यमातून लोकशाही पद्धतीने नियंत्रित केल्या जातात तसेच यासाठी सगळे सदस्य समान भांडवल देतात. त्या भांडवलाचा किमान भाग सहकारी संस्थेची मालमत्ता असते. सभासदत्वाच्या अटीनुसार सदस्यता घेतलेल्या भांडवलावर सामान्यत: मर्यादित नुकसान भरपाई सदस्यांना मिळते. सदस्यांना खालीलपैकी कोणत्याही हेतूसाठी अतिरिक्त पैसे वाटप केले जातात: त्यांची सहकारी संस्था विकसित करणे, शक्यतो राखीवसाठा स्थापित करून, ज्याचा काही भाग अविभाज्य असेल; सहकारी सदस्यांना त्यांच्या (सहकारी संस्थेसोबतच्या) व्यवहाराच्या प्रमाणात परतावा देण्यात येईल; आणि सदस्यत्वाच्या नियमावलीनुसार मंजूर केलेल्या इतर उपक्रमांना आधार देणे.


## तत्त्व ४: **स्वायत्तता आणि स्वातंत्र्य**




सहकारी संस्था ह्या त्यांच्या सदस्यांद्वारे नियंत्रित स्वायत्त आणि स्वयंपूर्ण संस्था आहेत. जर त्यांनी सरकारसह इतर संस्थांशी करार केले किंवा बाह्य स्त्रोतांकडून भांडवल उभे केले तर ते अशा सदस्यांद्वारे करतात जे त्यांच्या सदस्यांद्वारे लोकशाही नियंत्रण सुनिश्चित करतात आणि त्यांची सहकार स्वायत्तता टिकवून ठेवतात.

## तत्व ५: **शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती**

सहकारी संस्था ह्या त्यांचे सदस्य, निवडलेले प्रतिनिधी, व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांना ज्ञान, माहिती आणि प्रशिक्षण प्रदान करतात, जेणेकरून ते त्यांच्या उद्योगाच्या विकासास प्रभावीपणे योगदान देऊ शकतील.



## तत्त्व ६: **सहकारी संस्थामधील सहकार्य**

सहकारी संस्था त्यांच्या सदस्यांची सेवा सर्वात प्रभावीपणे करतात आणि स्थानिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय रचनांद्वारे एकत्र काम करून सहकारी चळवळ बळकट करतात.




## तत्व ७: **समाजाची चिंता**

सहकारी संस्था त्यांच्या सदस्यांनी मंजूर केलेल्या धोरणांद्वारे त्यांच्या समुदायांच्या शाश्वत विकासासाठी कार्य करतात.






सहकारी तत्त्वांचा तपशील परिशिष्टामध्ये देण्यात आला आहे. आता सहकारी तत्त्वांचा अर्थ पाहून आपण हे निश्चित केले पाहिजे की ही तत्त्वे आमच्या शेतकरी संस्थेमध्ये पाळली पाहिजेत. सहकारी तत्वांना प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचे मार्ग व त्यांचे वर्णन खालील सारणीमध्ये केले आहे. सहकारी तत्त्वांचे पालन किती प्रमाणात केले जाते हे मूल्यांकन करण्यासाठी ही यादी दिली आहे.

## सारणी १ : शेतकरी संस्थांमधील सहकारी तत्त्वांचा सारणी सराव

| अ.क्र | सहकारी तत्व | पद्धती | अंमलबजावणी यादी |
|---|---|---|---|
| **१** | **ऐच्छिक आणि मुक्त सदस्यता** | | |
| | सदस्यत्व निकष | * सदस्यत्वासाठी पात्रता निकष<br>* सदस्यत्वाची प्रक्रिया<br>* सदस्य बाहेर पडण्याची पद्धत | i. पोट–नियम आणि व्यवसायाचे नियम<br>ii. अर्ज, सदस्यता नोंदणी, पावती व लेजर बुक, समभाग प्रमाणपत्र<br>iii. पैसे काढण्याची नोंदणी व अर्ज |
| | सेवांचा वापर | * शेतकरी संस्थेद्वारे देऊ केलेल्या सेवा<br>* सेवांचा वापर | i. प्रत्येक सेवेसाठी व्यवसाय नोंदणीवही<br>ii. सदस्य पासबुक आणि खाती (सेवा निहाय) |


| अ.क्र | सहकारी तत्व | पद्धती | अंमलबजावणी यादी |
|---|---|---|---|
| | सदस्यता जबाबदारी पालन | ✻ सभासदाने सातत्याने निकष ठरवून किमान व्यवसाय व्यवहार निश्चित करणे<br>✻ सर्वसाधारण सभांमध्ये उपस्थिती<br>✻ मतदानास पात्र असलेल्या सदस्यांसाठीचे निकष<br>✻ निवडणुकांमधील आशयाचा निकष<br>✻ सदस्यांचा योग्य तो भरणा ना केल्याचा तपशील: भाग भांडवलाचा भरणा, सदस्यता शुल्क, सेवा शुल्क, सभासदांचे योगदान, बचत, कर्ज | i. पोट–कायदे आणि व्यवसायाचे नियम<br>ii. वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त वही<br>iii. मतदार यादी<br>iv. सभासद खाते पुस्तक / रोख पुस्तक |
| **२** | **लोकशाही सदस्य नियंत्रण** | | |
| | लोकशाही रचना मंडळाची | ✻ संचालक मंडळाची रचना – केवळ सदस्यांमधून<br>✻ संचालक मंडळाची मुदत<br>✻ निवडणूक प्रक्रिया<br>✻ प्रतिनिधित्व – भौगोलिक, श्रेणी, लिंग इ<br>✻ ते फेडरेशन असल्यास – आधारित प्रतिनिधित्व आकार, भौगोलिक सीमा, लिंग इ. | i. पोट–नियम आणि व्यवसायाचे नियम<br>ii. धोरणे आणि कार्यपद्धती<br>iii. वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त पुस्तिका |

| अ.क्र | सहकारी तत्व | पद्धती | अंमलबजावणी यादी |
|---|---|---|---|
| | निवडलेले प्रतिनिधी सदस्यांना जबाबदार असतात | ❋ कामकाजात पारदर्शकता<br>❋ सदस्य अभिप्राय आणि तक्रार निवारण प्रणाली<br>❋ नियमित निवडणुका<br>❋ संचालक मंडळ सदस्यांची पात्रता आणि सातत्य निकष<br>❋ निवडलेले प्रतिनिधी परत बोलवणे, त्यांची नियुक्ती रद्द करणे<br>❋ अंतर्गत नियंत्रणे<br>❋ वार्षिक सर्वसाधारण सभा आणि विशेष सर्वसाधारण सभा वेळेवर आयोजित करणे<br>❋ नियमित अंतर्गत आणि वैधानिक लेखापरीक्षा<br>❋ सर्वसाधारण मंडळाला वार्षिक अहवाल सादर करणे (प्रत्येक सदस्याला एक प्रत)<br>❋ सर्वसाधारण मंडळाकडे कडे बोर्डाच्या कामगिरीची नोंद करणे | iv. अद्ययावत मानकांचा वापर करून लेखा पद्धती<br>v. वार्षिक सर्वसाधारण सभा आणि विशेष सर्वसाधारण सभा इतिवृत्त पुस्तिका<br>vi. लेखा परीक्षण अहवाल<br>vii. लेखा परीक्षण संदर्भात कारवाईचा अहवाल<br>i. सर्व तपशीलांसह वार्षिक अहवाल<br>ii. सर्वसाधारण मंडळ कामगिरी अहवाल |
| **३** | **सदस्य आर्थिक सहभाग** | | |
| | शेतकरी संस्थेचा स्वतःचा निधी | शेतकरी संस्थेमध्ये सदस्याचे योगदान<br>❋ भाग भांडवल<br>❋ बचत<br>❋ सभासदांचे योगदान<br>❋ सभासद ठेवी | i. साधारण लेजर आणि वित्तीय विधाने |

| अ.क्र | सहकारी तत्व | पद्धती | अंमलबजावणी यादी |
|---|---|---|---|
| | भांडवलावर लोकशाही नियंत्रण | वार्षिक सर्वसाधारण सभा दरम्यान सर्वसाधारण मंडळ (खालील बाबींवर) निर्णय घेते :<br>✻ भाग भांडवलावर व्याज<br>✻ संरक्षणाची सूट<br>✻ राखीव निधीची तजवीज<br>✻ जोखीम व्यवस्थापन | i. साधारण खातेवही<br>ii. सदस्य खातेवही<br>iii. वार्षिक सर्वसाधारण सभासभेचे इतिवृत्त |
| | ✻ वार्षिक सर्वसाधारण सभाआणि विशेष सर्वसाधारण सभा वेळेवर आयोजित करणे<br>✻ नियमित अंतर्गत आणि वैधानिक ऑडिट<br>✻ सर्वसाधारण मंडळाला वार्षिक अहवाल सादर करणे (प्रत्येक सदस्याला एक प्रत)<br>✻ सर्वसाधारण मंडळामध्ये बोर्डाच्या कामगिरीची नोंद करणे | | |
| **४** | **स्वायत्तता आणि स्वातंत्र्य** | | |
| | निर्णयप्रक्रिया | ✻ मंडळाने अंतिम निर्णय घेणे<br>✻ स्वाक्षरी करण्यापूर्वी संचालक मंडळाने करारांच्या अटी आणि शर्तींविषयी चर्चा केली पाहिजे<br>✻ करारामध्ये इतर संस्थांचे नियंत्रण नसल्याचे सुनिश्चित करणे – विशेषत: कर्मचारी नियुक्त करणे, कर्मचाऱ्यांना थेट पगार देणे, कर्जाच्या स्वरूपात निधी देणे किंवा कामकाज चालविण्यासाठी नव्हे तर क्षमता वाढविण्यासाठी अनुदान देणे, दोन्ही बाजूच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या स्पष्ट करणे | i. संचालक मंडळाची बैठक इतिवृत्त<br>ii. करारासंबंधी धोरण |

| अ.क्र | सहकारी तत्व | पद्धती | अंमलबजावणी यादी |
|---|---|---|---|
| | आत्मनिर्भरता | ❉ दैनंदिन कामकाजाचा खर्च आणि आर्थिक खर्चाची पूर्तता करण्यासाठी कामकाजातून उत्पन्न मिळविणे<br>❉ स्थानिक स्त्रोत तयार करणे – उत्कृष्ट व्यवस्थापक, तरुण, [समुदाय संसाधन व्यक्ती (सीआरपी) इ.]<br>❉ शेतकरी संस्थेच्या कारभारावर वरिष्ठ पातळीवरील संस्था आणि नेटवर्कचा हस्तक्षेप नाही | i. दैनंदिन कामकाजासाठी स्वावलंबत्व<br>ii. आर्थिक स्वावलंबत्व<br>iii. निधी उभारण्याविषयी संबंधित धोरणे<br>iv. प्रशिक्षण अहवाल<br>v. सीआरपी नोंदणी पुस्तिका |
| **५** | **शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती** | | |
| | सदस्य शिक्षण | ❉ सदस्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे<br>❉ सर्वोत्कृष्ट सदस्य पुरस्कार<br>❉ सदस्यांना माहिती<br>❉ प्रशिक्षण, प्रदर्शनांचे आयोजन<br>❉ माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर (आयसीटी)<br>❉ तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, एफएफएस | i. पत्रके, पोस्टर्स, व्हिडिओ इ<br>ii. प्रशिक्षणासाठी निधीची तरतूद<br>iii. प्रशिक्षण अहवाल<br>iv. सूचना फलक लावणे<br>v. तांत्रिक संस्थां सह करार |
| **६** | **सहकारी संस्थांमध्ये सहकार्य** | | |
| | फेडरेशनशी संबंध | ❉ फेडरेशन कडून उपयुक्त सेवा एकत्रित करणे आणि उपयोग<br>❉ फेडरेशनला माहिती देणे<br>❉ फेडरेशनच्या बैठकीत भाग घेणे<br>❉ फेडरेशन मध्ये सदस्यता जबाबदारीची पूर्तता करणे | संचालक मंडळाच्या बैठकीत आणि वार्षिक सर्वसाधारण सभा बैठकीत फेडरेशन सदस्यत्व आढावा |

| अ.क्र | सहकारी तत्व | पद्धती | अंमलबजावणी यादी |
|---|---|---|---|
| | इतर शेतकरी संस्थेशी संबंध – अनुभवांची देवाणघेवाण आणि प्रशिक्षण | ✻ इतर शेतकरी संस्थाना भेट देऊन, त्यांच्याकडून अनुभवांची देवाणघेवाण आणि प्रशिक्षण<br>✻ अन्य शेतकरी संस्थाबरोबर संयुक्त व्यवसाय उपक्रम आणि व्यापार सुरू करणे<br>✻ इतर शेतकरी संस्थेसमवेत संयुक्तपणे इतर एजन्सीची सेवा घेणे<br>✻ कोणत्याही वकिलातीविषयक इतर शेतकरी संस्थेबरोबर काम करणे | i. संचालक मंडळ / कर्मचाऱ्यांसाठी अभ्यास सहली<br>ii. इतर शेतकरी संस्थेबरोबर करार |
| **७** | **समुदायाची जाणीव** | | |
| | स्थानिक समुदायाला सेवा पुरवठा | ✻ समाजातील सदस्यांच्या सामाजिक–आर्थिक विकासासाठी निधीची तजवीज<br>✻ स्थानिक रोजगार निर्माण करण्याबाबत धोरणे<br>✻ जमाखर्चाचा अभ्यास करून वाजवी मूल्यात सेवा प्रदान करणे<br>✻ समुदायाच्या विकास योजनांमध्ये सहभागी होणे<br>✻ स्थानिक आणि नैसर्गिक संसाधने तसेच पर्यावरण इत्यादींच्या शाश्वत विकासावर सेवांच्या प्रभावाचे पुनरावलोकन करणे | i. घटना आणि व्यवसायाचे नियम<br>ii. संचालक मंडळ आणि सर्वसाधारण सभा इतिवृत्ते<br>iii. सरकार आणि इतर संस्थांशी करार |



# परस्पर सहाय्य तत्त्वे

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ५८१ जी च्या उपकलम (२) मध्ये नमूद केल्यानुसार उत्पादक कंपन्यांना परस्पर सहाय्य तत्त्वे यांचे मार्गदर्शन केले जाईल. कायद्यात असे म्हटले आहे की ही तत्त्वे उत्पादक कंपनीच्या घटनेचा भाग असावा. आपल्याला दिसेल की, ही परस्पर सहाय्य तत्त्वे वर चर्चा केलेल्या सहकाराच्या तत्त्वांशी मिळती जुळती आहेत.

ही तत्त्वे पुढील तक्त्यात विस्तृतपणे दिली आहेत.

## सारणी २ : परस्पर सहाय्य तत्त्वे

| तत्त्व १ | ऐच्छिक सदस्यता |
|---|---|
| उत्पादक कंपनीच्या सुविधा किंवा सेवांचा लाभ घेऊ शकतील, त्यात भाग घेऊ शकतील. सदस्यत्व स्वीकारण्यास इच्छुक असलेल्या अशा सर्व पात्र व्यक्तींना हे सदस्यत्व ऐच्छिक व उपलब्ध असेल. | |
| **तत्व २** | **लोकशाही पद्धतीने सदस्य नियंत्रण** |
| शेतकरी संस्था त्यांच्या सदस्यांद्वारे नियंत्रित करणाऱ्या लोकशाही संस्था आहेत, जे मतदान आणि निर्णय घेण्यात सक्रियपणे भाग घेतात. पायाभूत उपक्रमांमध्ये, भागधारकाचा वाटा लक्षात न घेता केवळ एकच मत (एक सदस्य, एक मत) असेल. | |
| **तत्व ३** | **निवडलेल्या मंडळातर्फे शासन** |
| संचालक म्हणून निवडलेल्या व्यक्तींचा समावेश असलेल्या मंडळामार्फत उत्पादक कंपनी चालविली जाईल आणि हे मंडळ सदस्यांना जबाबदार असेल. | |
| **तत्त्व ४** | **मर्यादित परतावा** |
| सभासदांना भाग भांडवलावर मर्यादित परतावा (लेखात नमूद केल्यानुसार जास्तीत जास्त लाभांश) असेल. | |

### तत्त्व ५ सदस्यांचा आर्थिक सहभाग

उत्पादक कंपनीच्या कामकाजामुळे उद्भवलेल्या अतिरिक्त वस्तूंचे न्याय पद्धतीने वितरण केले जाईलः

(i) उत्पादक कंपनीच्या व्यवसायाच्या विकासासाठी नियोजन;

(ii) सामान्य सोयीसुविधा पुरवणे; आणि

(iii) सदस्यांमध्ये वाटप करणे, (जो) व्यवसायात त्यांच्या संबंधित सहभागाच्या प्रमाणात असेल

### तत्व ६ शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती

उत्पादक कंपनीत सदस्य, कर्मचारी आणि इतरांच्या शिक्षणाची तरतूद परस्पर सहाय्य करण्याच्या धर्तीवर केली जाईल.

### तत्व ७ उत्पादक संस्थांमध्ये सहकार्य

उत्पादक कंपनी स्थानिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर इतर उत्पादक कंपन्यासह (आणि तत्सम तत्त्वांचे पालन करणाऱ्या इतर संस्था) सक्रियपणे सहकार्य करेल जेणेकरून त्यांच्या सदस्यांचे आणि (त्या) ज्या समाज गटासाठी काम करतात त्यांचे हित साधू शकेल.

## सराव

शेतकरी संस्थांमधील वरील प्रत्येक तत्त्वाची काही उदाहरणे खाली दिली आहेत. प्रत्येक उदाहरणामध्ये त्या तत्त्वाचे पालन केले की नाही ते उत्तर देऊ या. तसेच स्पष्टीकरण देऊ (पालन केले आहे कि अवज्ञा केली आहे)

### तत्त्व १ : ऐच्छिक सदस्यता

दुग्ध सहकारी संस्थेत सर्व सदस्य महिला आहेत.

**उत्तर:** मान्य अमान्य

**स्पष्टीकरण:** ______________________________

______________________________

______________________________

शेतकरी संस्थेच्या मंडळाचे सदस्य वेगवेगळ्या विविध पद्धतींचा अवलंब करून सदस्यत्व मोहीम राबवतात आणि कार्यक्षेत्रातील पात्र, शेतकऱ्यांचा त्यांच्या शेतकरी संस्थेमध्ये सदस्य म्हणून नोंदणी करतात.

**उत्तर:** मान्य अमान्य

**स्पष्टीकरण:** ______________________________

______________________________

______________________________

दुसऱ्या एका शेतकरी संस्थेमध्ये ती देत असलेल्या सेवांना आश्रय देणे, सभासदांची कर्तव्ये या विषयी पुरेसे प्रशिक्षण न देता सदस्य नोंदणी झाली.

**उत्तर:** मान्य अमान्य

**स्पष्टीकरण:** ______________________________

______________________________

______________________________

### तत्व २: लोकशाही (पद्धतीने) सदस्य नियंत्रण

संस्थेच्या निम्म्या सदस्यांनी भाग भांडवलामध्ये दुप्पट हातभार लावला. अशा प्रकारे इतर सदस्यांपेक्षा त्यांच्याकडे मतदानाचे हक्क दुप्पट असावेत, अशी मागणी या सदस्यांनी केली.

**उत्तर:** मान्य अमान्य

**स्पष्टीकरण:** ______________________________

______________________________

______________________________

वरील सहकारी संस्थेमध्ये, पहिल्या सहामाहीत काही सदस्य उर्वरित अर्ध्या सदस्यांपेक्षा दुप्पट सेवा घेतात. अशाप्रकारे, या प्रकरणात देखील, त्यांच्याकडे दुप्पट मतदान करण्याचे अधिकार असावेत अशी मागणी त्यांनी केली.

**उत्तर:** मान्य अमान्य

**स्पष्टीकरण:** ______________________________

______________________________

______________________________

## तत्व ३: निवडलेल्या मंडळाचे शासन

शेतकरी संस्थेमध्ये, सर्वसाधारण सभेची बैठक आयोजित केली जाते ज्यामध्ये गणसंख्येपेक्षा जास्त सदस्य उपस्थित असतात, बैठकीस उपस्थित असलेले सर्व सदस्य मतदानात सक्रियपणे भाग घेतात आणि त्यांचे संचालक मंडळ निवडतात.

**उत्तर:** मान्य अमान्य

**स्पष्टीकरण:** ______________________________

______________________________

______________________________

वरील शेतकरी संस्थेमध्ये, संचालक मंडळ सर्वसाधारण सभेच्या मताप्रमाणे निर्णय घेते आणि नियमित अहवाल सदस्यांना सर्व आवश्यक माहितीसह नियमितपणे सादर करते.

**उत्तर:** मान्य अमान्य

**स्पष्टीकरण:** ______________________________

______________________________

______________________________

दुसऱ्या शेतकरी संस्थेमध्ये, प्रवर्तक संस्था मंडळावर सदस्यांची नेमणूक करते आणि अपात्र आणि सामर्थ्यवान सदस्य मंडळावर येण्यासाठी प्रयत्न करते.

**उत्तर:** मान्य अमान्य

**स्पष्टीकरण:** ______________________________

______________________________

______________________________

### तत्त्व ४: मर्यादित परतावा

शेतकरी संस्थेमध्ये,संचालक मंडळ शेतकरी संस्थेच्या आवश्यक अशा राखीव निधीची तरतूद न करता संपूर्ण नफा त्यांच्या सदस्यांना लाभांश म्हणून, त्यांच्या पोटनियमांत निर्दिष्ट केलेल्यापेक्षा जास्त रक्कम मंजूर करते.

**उत्तरः** मान्य अमान्य

**स्पष्टीकरणः** ______________________________

______________________________

______________________________

### तत्त्व ५: सदस्य आर्थिक सहभाग

शेतकरी संस्थेमध्ये, संचालक मंडळ शेतकरी संस्थेच्या विकास निधीची तरतूद, राखीव निधी इत्यादींची तरतूद करून आणि त्यांना वाटण्यासाठी पुरेसा अतिरिक्त निधी आहे याची खात्री करुनच सभासदांना फायदा वितरण करण्याचे ठरवते.

**उत्तरः** मान्य अमान्य

**स्पष्टीकरणः** ______________________________

______________________________

______________________________

सहकारी संस्थेने सदस्यांनी घेतलेल्या सेवा वेगवेगळ्या असल्या तरीही सर्व सदस्यांना समान प्रमाणात लाभांश वितरित करण्याचा निर्णय घेतला.

**उत्तरः** मान्य अमान्य

**स्पष्टीकरणः** ______________________________

______________________________

______________________________

एका शेतकरी संस्थेमध्ये, नफ्याचा काही भाग त्यांनी शेतकरी संस्थेशी केलेल्या व्यवसाय / व्यवहाराच्या प्रमाणात सदस्यांमध्ये वाटून घेतला.

**उत्तरः** मान्य अमान्य

**स्पष्टीकरणः** ______________________________

______________________________

______________________________

## तत्व ६: शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती

एका शेतकरी संस्थेमध्ये संचालक मंडळ, सदस्य आणि कर्मचाऱ्यांना परस्पर साहाय्य तत्त्वे यावर पुरेसे प्रशिक्षण दिले जात नव्हते. यामुळे त्या शेतकरी संस्थेमध्ये मंडळाची कोणतीही जबाबदारी नाही, सदस्यांनी दुर्लक्ष करणे इ. समस्या उद्भवल्या.

**उत्तर**: मान्य अमान्य

**स्पष्टीकरण**: ______________________________

______________________________

______________________________

## तत्व ७: उत्पादक संस्थांमध्ये सहकार्य

एक शेतकरी संस्था सभासदांना उत्पादनांच्या विक्रीची सेवा देत आहे. पायाभूत सुविधा आणि वित्तपुरवठा नसल्यामुळे जवळपासच्या भागातील आणखी एक शेतकरी संस्था विक्री करण्यास सक्षम नाही. स्वतःच्या सदस्यांकडून विक्रीची खात्री करुन घेतल्यानंतर पहिली शेतकरी संस्था दुसऱ्या शेतकरी संस्थेच्या उत्पादन विक्रीला पाठिंबा देण्यासाठी पुढे आली आणि दुसऱ्या शेतकरी संस्थेच्या सदस्यांनाही याचा फायदा झाला.

**उत्तर**: मान्य अमान्य

**स्पष्टीकरण**: ______________________________

______________________________


______________________________

उदाहरण किंवा अभ्यास: कृपया चर्चा करा आणि स्पष्ट करा की आपली शेतकरी संस्था वर नमूद केलेल्या तत्त्वांचे किती प्रमाणात पालन करते?

# ३

# शेतकरी संस्था मुख्य वैशिष्ट्ये

## सत्र उद्देश




**शेतकरी संस्थेच्या प्रमुख वैशिष्ट्यांविषयी समजून घेणे**

### मुख्य आशय

१. शेतकरी संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये

## शेतकरी संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये

जेव्हा जेव्हा आपण एखादी गोष्ट ओळखतो तेव्हा आपण काही गोष्टी गृहीत धरतो. उदाहरणार्थ, जेव्हा आपण गोलाकार बियाण्यांना सोयाबीन म्हणतो, तेव्हा आपल्याला त्याची काही वैशिष्ट्ये माहिती असतात. परंतु जर बियाणे जास्त लांब आकाराचे असले तर आपण त्याला आपण सोयाबीन म्हणत नाही, तर त्याला धान म्हणतो. धान म्हणून धान्य ओळखले जाण्यासाठी त्यात लांब बियाण्यासारखे काही विशिष्ट गुणधर्म असले पाहिजेत. तसेच शेतकरी संस्था ओळखण्यासाठी काही विशिष्ट गुणधर्म आहेत.



**भात**










उदाहरणार्थ, जर शेतकरी संस्था तिच्या सदस्यांना कच्चा माल पुरवठा करण्याची सेवा देत असेल तर एखाद्या कच्चा माल पुरविणाऱ्या व्यापाऱ्यापेक्षा ती वेगळी कशी असू शकते? तुम्हाला काय वाटते की शेतकरी संस्थेमध्ये कोणते गुणधर्म असणे आवश्यक आहे.

| शेतकरी संस्था | कच्चा माल पुरविणारे व्यापारी |
| --- | --- |
| | |

वरील चर्चा आपल्याला खाली दर्शविल्याप्रमाणे शेतकरी संस्थेच्या मुख्य वैशिष्ट्यांकडे घेऊन जाते.


## आकृती ३: शेतकरी संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये

### व्यावसायिक उपक्रम



✻ उत्पादन पूर्व, उत्पादन, उत्पादनोत्तर सेवा प्रदान करणे

### स्वायत्त आणि स्वतंत्र




✻ शेतकऱ्यांचे स्वत:च्या मालकीचे व्यावसायिक उपक्रम

### औपचारिक संस्था




✻ नोंदणीकृत, कर्मचारी आणि प्रणालींसह कायदेशीर अस्तित्व

## सदस्याच्या मालकीचे




* सदस्यांच्या मालकीचे, सदस्यांद्वारे वापरले जाणारे आणि नियंत्रित होणारे
* सदस्यांना आवश्यक सेवा प्रदान करणारे

## सदस्यांकडून समभाग खरेदी




* सभासद भांडवलात हातभार लावतात

## स्वराज्य



* संचालक मंडळाद्वारे आणि सदस्यांद्वारे निवडलेले संचालक मंडळ

## लोकशाही नियंत्रण




* एकसदस्य, एकमत

वर दर्शविल्याप्रमाणे, शेतकरी संस्था ही नोंदणीकृत, औपचारिक अस्तित्व असणारी संस्था आहे, ज्याकडे तिचे संचालक मंडळ, व्यवस्थापनासाठी कर्मचारी आणि कामकाजासाठी नियमावली आहे. ही एक कायदेशीर संस्था आहे जी देशातील सर्व कायद्यांचे पालन करते. हा एक खासगी व्यवसाय आहे जो शेतकरी सदस्यांच्या मालकीचा आहे. ते कच्च्या मालाचा पुरवठा, बियाणे उत्पादन, सदस्यांसाठी वित्त, उत्पादकता वाढविण्यासाठी सेवा, खरेदी, प्रक्रिया आणि मूल्यवर्धन आणि विपणन यासारखे विविध उपक्रम राबवित असतात.

४

# नोंदणी – गरज आणि महत्त्व

## सत्र उद्देश



**नोंदणीची गरज व महत्व समजावून घेणे**

**शेतकरी संस्थेसाठी वेगवेगळे कायदेशीर रूपे जाणून घेणे**

### मुख्य आशय

१. नोंदणीचे महत्व आणि आवश्यकता

२. शेतकरी संस्थेसाठी वेगवेगळे कायदेशीर रूपे

विकासच्या कार्यकर्त्याने आधीच्या सत्रापासून पुढील सत्र सुरु ठेवले. आधीच्या सत्रामध्ये पाहिल्याप्रमाणे, शेतकरी संस्थाना आपल्या सदस्यांना सेवा देण्यासाठी विविध व्यावसायिक क्रिया करणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी वेगवेगळ्या संस्थांसमवेत करार करणे, अर्थसहाय्य घेणे आणि अन्य आवश्यक संसाधने वाढवणे देखील आवश्यक आहे. हे करण्यासाठी, शेतकरी संस्थेचे कायदेशीर अस्तित्व असणे आवश्यक आहे आणि म्हणूनच नोंदणी आवश्यक आहे.

मग त्यांनी सहभागींना विचारले, नोंदणी म्हणजे काय? समजा, जर आपली शेतकरी संस्था वन उत्पादनांशी संबंधित व्यवहार करत असेल तर; आपण आपल्या शेतकरी संस्थेची नोंद वन विभागाकडे करतो. आपण सहकारी संस्था म्हणून आपली शेतकरी संस्था नोंदवतो. या दोन नोंदणींमध्ये काय फरक आहे?

काही उत्तरे मिळाल्यानंतर आपल्या प्रतिनिधीने खालीलप्रमाणे नमूद केले.

वनविभागाकडे नोंदणी करणे म्हणजे शेतकरी संस्था वन विभागात कार्यरत असल्याची आणि अस्तित्वात असल्याची माहिती देणे. सहकारी संस्था म्हणून नोंदणीकृत झाल्यास शेतकरी संस्थेला बॉडी

कॉर्पोरेट दर्जा मिळतो. याचा अर्थ असा की एखादी संस्था नोंदणीकृत असल्यास त्यास काही हक्क असतील जसे की व्यक्तींना लागू असतात. ती खरेदी करू शकते. ती विकू शकते. तिची मालमत्ता असू शकते. ती व्यवसाय करू शकते.

उदाहरणार्थ, जर आपल्या कुटुंबाची एक एकर जमीन असेल तर आपण आपली जमीन का नोंदवितो?

आपला प्रतिसाद खाली असलेल्या जागेत लिहा.

---

---

---

उत्तरे मिळाल्यानंतर त्यांनी खालीलप्रमाणे मुद्दे एकत्रित केले.

जमीन नोंदणी करून आम्हाला आमच्या नावावर ती जमीन तारण ठेवणे किंवा भाडेतत्वावर देणे किंवा विक्री करणे असे कायदेशीर अधिकार मिळतात. आम्ही संयुक्तपणे पीक काढू शकतो, आम्ही आमच्या नावावर बँक किंवा इतर वित्तीय संस्थांकडून देखील कर्ज घेऊ शकतो. जर आमच्या जमिनीवर कोणतीही व्यक्ती अतिक्रमण करत असेल तर आम्ही त्याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करू शकतो आणि त्याचप्रमाणे जर आपण काही लोकांच्या जमिनीवर अतिक्रमण केले तर ते आमच्यावर गुन्हा दाखल करू शकतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण आपली जमीन आपल्या पुढच्या पिढ्यांकडे म्हणजे आपली मुलगी / मुलगा, नात, नातू इत्यादीकडे हस्तांतरित करू शकतो.

त्याचप्रमाणे, आपण आपली शेतकरी संस्था नोंदणी केल्यास आपल्या शेतकरी संस्थेला कायदेशीर अधिकार मिळतात. याचा अर्थ एखाद्या व्यक्तीप्रमाणे, स्वतःच्या नावावर सदर शेतकरी संस्था

- बाह्य संस्था / संस्था यांच्याशी करार करू शकते
- तिच्या मालकीची मालमत्ता असू शकते आणि संस्थेच्या नावे मालमत्ता खरेदी, विक्री आणि तारण यासारख्या व्यवहारात गुंतवणूक करणे शक्य होते.
- ती कोणत्याही व्यक्तीवर किंवा संस्थेकडे कायदेशीर कारवाई करू शकते किंवा इतरांविरूद्ध दावा दाखल करू शकते.
- त्यात सदस्य सामील होऊ शकतात आणि सदस्यत्व रद्दही करू शकतात, शेतकरी संस्था भविष्यातील पिढ्यांना ही सेवा देत राहू शकते

# शेतकरी संस्थेसाठी कायदेशीर रूपे

शेतकरी संस्थेसाठी योग्य कायदेशीर प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

१. कंपनी अॅक्ट २०१३ अंतर्गत उत्पादक कंपनी, भारत सरकार, कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालय.

२. बहु–राज्य सहकारी संस्था अधिनियम, भारत सरकारचे कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या सहकारी संस्था.

३. संबंधित राज्यांच्या सहकारी कायद्यांतर्गत उदाहरणार्थ, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०

उत्पादक कंपन्यांना त्यांनी ठरवलेल्या व कंपनी रजिस्टर ने मंजूर केलेल्या घटनेद्वारा मार्गदर्शन केले जाते.ही घटना निश्चित केलेली आणि कंपनीच्या रजिस्ट्रारद्वारे मंजूर केलेली असते.

सहकारी संस्थांनी ठरवलेल्या आणि सहकार निबंधकांनी मंजूर केलेल्या नियमावलीच्या साहाय्याने सहकारी संस्थांचे नियंत्रण केले जाते.

घटनेमध्ये शेतकरी संस्थेचा हेतू, आणि तीच्या कामकाजाच्या विविध पैलूंचा तपशील असतो आणि ते शेतकरी संस्थेच्या कामकाजासाठी मार्गदर्शक दस्तऐवज म्हणून काम करतात.

आपण पुढील बैठकीत सहकारी संस्थांची तत्त्वे आणि परस्पर साहाय्य तत्त्वांविषयी चर्चा करू असे सांगून विकास संस्थेच्या कार्यकर्त्याने सदर चर्चा समाप्त केली.

यासह, शेतकरी संस्था प्रवर्तकांसाठी या अभ्यासामध्ये शेतीतील अडचणी दूर करण्यासाठी सामूहिक कृतीची आवश्यकता, सहकाराची मूलभूत वैशिष्ट्ये, मूल्ये आणि शेतकरी संस्थेची तत्त्वे समाविष्ट असलेला ओळख कार्यक्रम संपन्न झाला.

जरी रमेश आणि सुदर्शन यांना यापूर्वी शेतकरी गटांबद्दल माहिती असली तरी त्यांना हा प्रकार आणि दृष्टीकोन वेगळा वाटला. ते आता खूप उत्सुक आहेत, त्यांची शेतकरी संस्था लवकरांत लवकर नोंदणी करण्याच्या प्रयत्नात आहे आणि शेतकरी संस्थेमध्ये सदस्य होण्यासाठी सहकारी शेतकऱ्यांना एकत्रित करण्याची ठोस योजना त्यांनी बनविली आहे. भविष्यातील संपूर्ण मार्गक्रमणा त्यांना स्पष्ट नसली तरी रमेश आणि सुदर्शन यांना आपल्या शेतकरी संस्थेच्या स्वरूपात आशेचा किरण दिसतो आहे आणि आता ते परत आपल्या गावी परतू लागले आहेत.

# नमुना नोंदणी प्रमाणपत्र

सत्यमेव जयते

**GOVERNMENT OF INDIA**
**MINISTRY OF CORPORATE AFFAIRS**

Central Registration Centre

## Certificate of Incorporation

[Pursuant to sub-section (2) of section 7 of the Companies Act, 2013 (18 of 2013) and rule 18 of the Companies (Incorporation) Rules, 2014]

I hereby certify that SRI NALLAREDDY SWAMY FARMERS PRODUCER COMPANY LIMITED is incorporated on this Twenty fourth day of May Two thousand nineteen under the Companies Act, 2013 (18 of 2013) and that the company is limited by shares.

The Corporate Identity Number of the company is U01100AP2019PTC111980.

The Permanent Account Number (PAN) of the company is **ABCCS1151N** */@

The Tax Deduction and Collection Account Number (TAN) of the company is **VPNS16430B** */@

Given under my hand at Manesar this Twenty fourth day of May Two thousand nineteen .

Digital Signature Certificate
ALOK TANDON
Deputy Registrar Of Companies
For and on behalf of the Jurisdictional Registrar of Companies
Registrar of Companies
Central Registration Centre

Disclaimer: This certificate only evidences incorporation of the company on the basis of documents and declarations of the applicant(s). This certificate is neither a license nor permission to conduct business or solicit deposits or funds from public. Permission of sector regulator is necessary wherever required. Registration status and other details of the company can be verified on www.mca.gov.in

---

Mailing Address as per record available in Registrar of Companies office:

SRI NALLAREDDY SWAMY FARMERS PRODUCER COMPANY LIMITED

3-105, Handri Khairawadi, Gonegandla, KURNOOL, Kurnool, Andhra Pradesh, India, 518463

* as issued by the Income Tax Department

# नोंदणीचे प्रमाणपत्र

नोंदणी क्र.– टि. एन. ओ. /जे. एच. आर. /एम. के. टी. /(जे) /५७६ /सन २००२–२००३

या प्रमाणपत्राव्दारे प्रमाणित करण्यात येत आहे की, आमराई आदिवासी मित्र फळ प्रकिया व खरेदी विक्री सहकारी संस्था मर्या. पिंपळशेत ता. जव्हार जि. ठाणे ही संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचे अधिनियम, १९६० मधील (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम कमांक २४ ) कलम ९ (१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे.

उपरिनिर्दिष्ट अधिनियमांच्या कलम १२ (१) अन्वये व महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचे नियम कमांक १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण कृषि संस्था असून उप–वर्गीकरण फलोद्यान पणन संस्था आहे

कार्यालयीन मोहर

ASSISTANT REGISTRAR, CO-OP. SOCIETY (TSP)
WADA

भुजंग मेश्राम
सहायक निबंधक सहकारी संस्था,
व सावकारांचे सहायक निबंधक
(आउयो), वाडा तालुका जि. ठाणे

वाडा
दिनांक:– २१ /०५ /२००२

# परिशिष्ट १: सहकाराची तत्वे तपशीलवार

## तत्त्व १ ऐच्छिक व मुक्त सदस्यत्व

शेतकरी संस्था कार्यरत क्षेत्रामध्ये केवळ शेतकरी संस्थेच्या सेवांचा वापर करू शकतील आणि सदस्य म्हणून जबाबदाऱ्या स्वीकारण्यास इच्छुक असणाऱ्यांनाच सदस्य म्हणून स्वीकारले पाहिजे. तथापि, हे पुरेसे नाही की एखादी व्यक्ती सेवा वापरण्यास सक्षम आहे, तर त्या व्यक्तीने सदस्य म्हणून राहण्यासाठी त्या सेवांचा प्रत्यक्षात उपयोगही केला पाहिजे

बाह्य विकास संस्थेद्वारे शेतकरी संस्था स्थापनेची सोय केली गेली असली तरी शेतकरी सक्तीने नव्हे तर स्वेच्छेने सदस्यता घेतात.

## तत्व २ लोकशाही (पद्धतीने) सदस्य नियंत्रण

शेतकरी संस्थेमध्ये सर्व सदस्यांना मतदानाचे समान अधिकार आहेत. फेडरेशन स्तरावरही शेतकरी संस्था लोकशाही पद्धतीने चालविले जातात

संचालक मंडळाची निवड करून, निर्णय घेण्यात आणि धोरणे व दिशानिर्देशात सक्रियपणे भाग घेऊन सदस्यांकडून लोकशाही मार्गाने शेतकरी संस्थेवर नियंत्रण ठेवले जाते. मोकळेपणा, पारदर्शकता आणि जबाबदारी ह्या लोकशाही कारभाराच्या तीन प्रमुख बाबी आहेत.

## तत्व ३ सदस्य आर्थिक सहभाग

ह्या सिद्धांतात सांगितले आहे की शेतकरी संस्थेने खालील बाबी योग्यप्रकारे पाळणे आवश्यक आहे जसे

* जर शेतकरी संस्थेला नफा मिळाला तर प्रत्येकाला आनंद वाटतो आणि ते त्यामध्ये वाटा घेतात. तोटा झाल्यास शेतकरी संस्थेने सभासदांचे ओझे कमी करण्यासाठी जोखीम कमी करण्याचे उपाय करून सभासदांच्या हिताचे रक्षण केले पाहिजे. म्हणूनच, ह्या सिद्धांतात सांगितले आहे की, आमच्या शेतकरी संस्थेची शिल्लक ही शेतकरी संस्थेची मालमत्ता आहे, आणि शेतकरी संस्थेच्या व्यवसायाचे रक्षण करण्यासाठी काही भाग राखीव ठेवला जाऊ शकतो, त्याचे लाभांशामध्ये रूपांतर होणार नाही.
* जास्तीचा काही भाग दोन प्रकारे वापरला जाऊ शकतो.
* (१) आपल्या शेतकरी संस्थेला नफा मिळतो कारण तो सदस्यांद्वारे वापरल्या जाणार्याव सेवांमुळे. म्हणूनच, त्यांचे भागभांडवल आणि ठेवींवरील व्याजाव्यतिरिक्त, जे सदस्यत्व मानदंडांचे

पालन करतात आणि शेतकरी संस्थेच्या सेवा अधिक प्रभावीपणे वापरतात अशा सदस्यांना शेतकरी संस्थेबरोबरच्या त्यांच्या व्यवहारानुसार फायदा मिळू शकतो. उदाहरणार्थ, डेअरी शेतकरी संस्थेमध्ये एक सदस्य वर्षाकाठी ३०० लिटर दुधाचा पुरवठा करतो आणि इतर पारंपारिक आणि प्रगत अशा तांत्रिक सेवा देखील वापरतो; तर दुसरा सदस्य वर्षाकाठी ३०० लिटर पुरवतो पण इतर सेवा वापरत नाही. त्यांना शेतकरी संस्थेकडून समान लाभ मिळावा का? नाही, अधिक सेवा घेतलेल्या सदस्यांकडून शेतकरी संस्थेला नफा मिळतो. त्यामुळे पहिल्या सदस्याला दुसऱ्या सदस्यापेक्षा जास्त फायदा मिळायला हवा.

* (२) सदस्यांनी मान्यता दिलेल्या अन्य कामांना मदत. शैक्षणिक संस्था, आरोग्य सेवा इत्यादींच्या स्थापनेत आपले योगदान देणे देखील शक्य आहे ज्यातून सर्व सदस्यांना फायदा होऊ शकतो. कारण सगळ्यांनी या नफ्यामध्ये हातभार लावला आहे, किंवा अशा योगदानाने कोणा एकावर इतरांच्या खर्चाचा भार पडत नाही.

## तत्व ४ स्वायत्तता आणि स्वातंत्र्य

सहकाऱ्यांना स्वत:चा कारभार करण्यासाठी स्वतंत्रपणे कार्य करण्याचे स्वातंत्र्य आहे, स्वत:च्या कारभारावर नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे स्वत:चे संचालनाचे नियम निश्चित करणे, सहकारी संस्थांची स्वायत्तता आणि स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या दृष्टीने सरकारी, वित्तीय संस्था, स्पर्धक, तांत्रिक संस्था इत्यादीशी करार केले आणि अंमलात आणले जातात.

## तत्व ५ शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती

सहकारी संस्थांनी त्यांचे सदस्य, संचालक मंडळ, कर्मचारी आणि त्यांच्याबरोबर काम करणारे इतर सारेजण यांनी त्यांचे उद्देश आणि त्यांच्या कार्याबद्दल माहिती करुन घ्यावी. यासाठी सतत प्रशिक्षण घेणे, पत्रके, माहितीपत्रके, पोस्टर्स, व्हिडिओ आणि इतर माध्यामांद्वारे माहिती ची देवाणघेवाण करणे आवश्यक आहे हे तत्व सहकारी संस्थांनी सामान्य लोकांना, विशेषत: तरुणांना आणि सामाजिक नेतृत्वाला सहकाराचे स्वरूप आणि त्याचे फायदे याबद्दल शिक्षित करण्याची अपेक्षा करते. सहकारी संस्थांना बाजारात योग्य स्थान मिळावे यासाठी ते व्यवसायाच्या रूपाने देत असलेले योगदान धोरणकर्ते व इतरांनी समजून घेतले पाहिजे.

## तत्त्व ६ सहकारी संस्थांमधील सहकार्य

सहकारी संस्था इतर सहकारी संस्थांना सहकार्य करु शकतात आणि आणि जीवघेण्या स्पर्धेतही थोड्या जणांच्या स्वार्थापेक्षा अनेकांसाठी संपत्ती निर्मिती करू शकतात. सदस्यांना केवळ त्यांच्या स्वतःच्या सहकारी संस्थेच्या कृतीचाच फायदा होत नाही तर त्याचसोबत त्यांच्या सहकारी संस्थेने केलेल्या इतर सहकारी संस्थांबरोबरच्या संबंधांचा आणि व्यापाराच्या परिणामाचाही फायदा होतो.

एकत्र काम करून, सहकारी संस्था ह्या जागरूकता, टिकाव आणि प्रभाव वाढविण्यासाठी आवश्यक कौशल्य, अधिक प्रमाणात मिळवतात आणि समर्थन प्राप्त करतात, खासकरुन जेथे निश्चित खर्च आणि संसाधने सामायिकरित्या वापरली जाऊ शकतात.

एकटी सहकारी संस्था तिच्या सदस्यांच्या सर्व गरजा पूर्ण करू शकत नाही. अशा परिस्थितीत सहकारी संस्था इतर ब्लॉक, राज्य, राष्ट्रीय आणि अंतर्गत स्तरावर अन्य शेतकरी संस्थेबरोबर काम करू शकतात. उदाहरणार्थ, अतिरिक्त निधी उपलब्ध असणारी सहकारी संस्था आवश्यकता असलेल्या इतर सहकारी संस्थांना कर्ज देऊ शकते; एक सहकारी संस्था पुरेसे धान बियाणे तयार करते आणि इतर सहकारी संस्थांना पुरवठा करू शकते ज्यांच्या सदस्यांना धान बियाण्याची जास्त गरज आहे.

## तत्व ७ समुदायाची चिंता

सहकारी संस्था समुदायाच्या हितास बाधा होईल अशा पद्धतीने कार्य करतील अशी अपेक्षा नाही. हा सिद्धांत सूचित करतो की पर्यावरणीय समतोल, सामाजिक न्याय आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी काम करण्याची सहकारी संस्थांची जबाबदारी आहे. उदाहरणार्थ, एखादी सहकारी संस्था कीटकनाशकांची मोठ्या प्रमाणात खरेदी करून शेतकऱ्यांना जास्त प्रमाणात पुरवठा करीत असेल तर त्याचा पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होईल. तसेच, भूगर्भातील पाणी पातळी चिंताजनक रीतीने कमी होत असतानाही बहुसंख्य सदस्यांसाठी बोरवेलसाठी कर्ज पुरवणे, याचा परिणाम सभासदांवर होतो. म्हणूनच सहकारी संस्थानी योग्य धोरण ठरवून हे तत्व राखले पाहिजे.

# स्वयंमूल्यमापन

पुस्तिकेच्या सुरूवातीस नमूद केल्याप्रमाणे कृपया हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे कि, त्या पानावर मूलभूत प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.

आता आपण वरील विषयाच्या पुस्तिकेच्या शेवटच्या टप्प्यावर आलो आहोत.

या शेवटच्या टप्प्याचा उद्देश असा आहे की वरील पाठ्यक्रमामुळे वाढलेल्या ज्ञानासंदर्भात स्वत:चे मूल्यांकन करणे

तर आपल्या शिक्षणावर आधारित आणखी काही प्रश्नांची उत्तरे देऊ या का?

**१. शेतकरी संस्थेचा मुख्य हेतू काय आहे?**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**२. शेतकरी संस्थेचे फायदे काय आहेत?**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**३. शेतकरी संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती आहेत?**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**४. शेतकरी संस्था आपली स्वायत्तता आणि स्वातंत्र्य कसे टिकवून ठेवू शकतात?**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**५. शेतकरी संस्थेमध्ये लोकशाही पद्धतीने नियंत्रण कसे केले जाते?**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

# पुस्तिकेतील प्रमुख कृती बिंदू

## शेतकरी संस्था: परिचय आणि गरज

ह्या पुस्तिकेच्या आधारे आपल्या शेतकरी संस्थेचा परिचय आणि गरज ह्या विषयीची माहिती लिहा.

## टिपणे

# टिपणे

## टिपणे

# टिपणे

## व्यावसायिक उपक्रम

उत्पादन पूर्व,
उत्पादन आणि
उत्पादनानंतर
सेवा उपलब्ध



## स्वायत्त आणि स्वतंत्र

शेतकऱ्यांच्या
मालकीचा खाजगी
व्यवसाय



## औपचारिक संस्था

नोंदणीकृत,
कर्मचारी आणि
कार्यप्रणालींसह
कायदेशीर अस्तित्व




# शेतकरी संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये



## सदस्याच्या मालकीचे

सदस्यांच्या मालकीचे,
सदस्यांद्वारे
वापरले जाणारे
आणि नियंत्रित होणारे



## सदस्यांकडून समभाग खरेदी

सदस्य
भागभांडवल
खरेदी करतात



## स्वराज्य

सदस्यांद्वारे आणि
सदस्यांमधून निवडलेल्या
संचालक मंडळातर्फे
नियंत्रण



## लोकशाही नियंत्रण

एक सदस्य,
एक मत



## एपीएमएएसबाबत

एपीएमएएस ही एक ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी राष्ट्रीय स्तरावरील स्त्रोत संस्था आहे महिला बचत गट (एसएचजी) आणि त्यांच्या संघटना, सहकारी संस्था, शेतकरी संस्था (एफपीओ) आणि इतर समुदाय आधारित संस्था (सीबीओ) ज्यांचा आत्मनिर्भर, परस्पर सहकार्य, स्वयं शिस्त अशा मार्गदर्शक मुल्यांवर ज्यांचा विश्वास आहे अशांच्या सबलीकरणासाठी एपीएमएएस कार्यरत आहे.





# जागृती - शेतकरी संस्था परिचय आणि गरज

शेतकरी संस्थांना प्रोत्साहन आणि साहाय्य करणाऱ्या संस्थांना शाश्वत उद्योग विकसित आणि मार्गदर्शन करण्यासाठी एपीएमएएसने शेतकरी संस्था साहाय्य केंद्र स्थापन केले आहे. या संस्था बळकट करण्यासाठी लागणारी ध्येय-धोरणे, प्रशासन-व्यवस्थापन क्षमता वाढवणे यासारख्या विविध सेवा उपलब्ध करून देत आहे. त्याचबरोबरही संस्था शेतकरी संस्थांना व्यवसाय नियोजन, आर्थिक दुवे, विपणन विकसित करण्यासाठी तांत्रिक साहाय्य उपलब्ध करून देते.


साहाय्य

DGRV

द्वारा प्रकाशित

BAIF

apmas